**कोवीड-१९ साथरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ राज्यातील सर्व नागरिकांना सर्व अंगीकृत रुग्णालयांमार्फत उपलब्ध करून देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रास्वयो-२०२०/प्र.क्र.८०/आरोग्य-६**
जी.टी. रुग्णालय आवार, १० मजला
मंत्रालय, मुंबई -०१
**दिनांक: २३ मे, २०२०**

**वाचा :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि. २६ फेब्रुवारी, २०१९

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांचे क्र. राआहसो/मुकाअ/कोविड-१९/५४३/२०२० दिनांक २७.०४.२०२० चे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये संदर्भीय दिनांक २६.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना संलग्नीकरण करून एकत्रित स्वरूपात मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या सहकार्याने दिनांक ०१.०४.२०२० पासून अंमलात आली आहे. सदर योजनेत सुमारे ८५ ते ९० टक्के नागरिकांचा लाभार्थी म्हणून समावेश होत असून उर्वरीत नागरिक योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांची अंमलबजावणी व सनियंत्रण राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत केले जाते. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत पिवळी, केशरी, अंत्योदय, अन्नपुर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे आणि अवर्षणग्रस्त १४ जिल्ह्यांमधील (औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा) शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जीवित नोंदणीकृत लाभार्थी कुटुंबे समाविष्ट आहेत. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना-२०११ मधील नोंदित लाभार्थी कुटुंबे समाविष्ट असून ग्रामीण भागासाठी स्वाभाविक निकष व शहरी भागासाठी व्यावसायिक निकष ठेवण्यात आले आहेत.

सध्या जगभर पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण देशभरात झाली असून कोरोनाबाधित रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्र राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक कोरोनाबाधित रुग्णांची संख्या झालेली आहे. त्यामुळे राज्यातील कोरोना संशयित रुग्णांमध्ये होणारी वाढ लक्षात घेता अधिकाधिक रुग्णालयात उपचारांची सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार राज्यामध्ये काही ठिकाणी शासकीय रुग्णालये कोविड-१९ रुग्णालये म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत. या पार्श्वभुमीवर कोविड -१९ रुग्णांना अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी आर्थिक बोजा पडू नये तसेच कोविड -१९ महामारीच्या संकटामध्ये सर्वच नागरिकांना आरोग्य विषयक हमी व आर्थिक दिलासा मिळावा यासाठी मर्यादित कालावधीसाठी योजनेची व्याप्ती सर्व नागरिकांसाठी वाढविण्याचा प्रस्ताव राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून प्राप्त झालेला आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील उपचारांचा लाभ लाभार्थी रुग्णांबरोबर इतर रुग्णानांदेखील मिळावा आणि शासकीय रुग्णालयाकरीता राखीव असलेल्या उपचार पद्धती उपलब्ध व्हाव्यात व योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयातील डॉक्टर, इतर कर्मचारी व अनुषंगीक कर्मचारी यांना कोविड -१९ साथरोग प्रतिबंध संदर्भात आवश्यक साधन सामग्री उपलब्ध व्हावी याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानुसार शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

१. कोविड -१९ उद्रेकाच्या पार्श्वभुमीवर संभाव्य परिस्थितीचा विचार करून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्याकरीता लाभार्थी रुग्णांबरोबर राज्यातील सदर योजनेचे लाभार्थी नसलेल्या इतर रुग्णांनादेखील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये कोविड-१९ साठी उपचार अनुज्ञेय राहील. याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीने विहीत कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करावी. (लाभार्थ्याला रहिवासी पुरावा म्हूणन वैध पिवळी, केशरी, शुभ्र शिधापत्रिका, तहसीलदार यांचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यांपैकी कोणतेही एक पुरावाजन्य कागदपत्र सादर करावे लागेल, त्याबरोबरच शासनमान्य फोटो ओळखपत्र देणे आवश्यक राहील. कोरोनाच्या साथीचे गांभीर्य, उपचाराची तातडी पाहता उपचारासाठी आवश्यक कागदपत्राबाबत शिथिलता देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांना देण्यात येत आहेत. कोरोनाच्या उपचारासाठी योजनेतील समाविष्ट पॅकेजची यादी या आदेशासोबत प्रपत्र "अ" प्रमाणे राहिल.)

२. सद्यस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ९९६ उपचार व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १२०९ उपचार पुरविले जात असून याचा लाभ राज्यातील २.२३ कोटी कुटुंबांना मिळत आहे. या अंतर्गत राज्यातील सुमारे ८५% लोकसंख्येचा समावेश होतो. तथापि राज्यातील कोविड-१९ उद्रेकाची सद्यस्थिती पाहता सद्यस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट नसलेल्या राज्यातील रहिवासी असलेल्या उर्वरीत

नागरिकांनासुद्धा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अनुज्ञेय ९९६ उपचार पद्धतींचा लाभ मान्यता प्राप्त दराने सर्व अंगीकृत रुग्णालयामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

**३.** शासकीय रुग्णालयाकरीता राखीव असलेल्या १३४ उपचारापैकी सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व श्रवणयंत्राचा उपचार वगळता १२० उपचार अंगीकृत खाजगी रुग्णालयांना ३१ जुलै, २०२० पर्यंत मान्यता प्राप्त दराने देण्यात यावेत. (राखीव उपचारांची यादी प्रपत्र "ब" मध्ये दर्शविण्यात आलेली आहे). योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या खर्चाची प्रतीपुर्ती विमा कंपनीकडून व योजनेंतर्गत लाभार्थी नसलेल्या कुटुंबांच्या उपचाराची खर्चाची प्रतिपुर्ती संबंधित रुग्णालयास राज्य शासनाद्वारे राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांचेमार्फत हमी तत्वावर करण्यात येईल.

**४.** सदरील आदेशासोबत जोडलेल्या प्रपत्र "क" मध्ये समाविष्ट असलेले काही किरकोळ व काही मोठे उपचार व काही तपासण्या ज्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट नाहीत. त्या उपचार व तपासण्या सदरील योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये सर्व लाभार्थ्यांना (योजनेंतर्गत लाभार्थी असलेले व लाभार्थी नसलेले) CGHS च्या दरानुसार (NABH/NABL) उपलब्ध करून देण्यात येतील. सदर खर्चाची प्रतीपुर्ती संबंधित रुग्णालयास राज्य शासनाद्वारे राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांचेमार्फत हमी तत्वावर करण्यात येईल.

**५.** कोविड -१९ साठी शासनाने जाहीर केलेल्या खाजगी अंगीकृत रुग्णालयांकडून कोरोना संशयीत रुग्णांवर उपचार करण्याकरीता PPE किट्स व N-९५ मास्कचा आवश्यक वापर करण्यात येईल त्या प्रमाणात प्रत्यक्ष शासनाने ठरविलेल्या दरानुसार निधी देण्यात येईल. याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचेमार्फत सनियंत्रण केले जाईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. तसेच प्रतीपुर्ती करण्यापुर्वी सर्व बाबी तपासून अनावश्यक आर्थिक भार पडणार नाही, याची खबरदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांची राहिल.

**६.** सदरील प्रयोजनार्थ येणारा खर्च हा सोसायटीस वित्तीय वर्षात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीमधून भागविण्यात यावा. योजनेची अंमलबजावणी राज्य आरोग्य हमी सोसायटीने योजनेची मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तीनुसार करावी.

**७.** सदर योजना ३१ जुलै, २०२० पर्यंत अंमलात राहील. तद्नंतर याबाबत आढावा घेऊन मुदतवाढीचा निर्णय शासनस्तरावरून घेण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. १६१/२०२०/व्यय-१३, दिनांक १९.०३.२०२० अन्वये देण्यात आलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००५२३१२५०५६२११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रदीप व्यास 23-5-2020

**(डॉ.प्रदीप व्यास)**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८) सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई- २१
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१२) विभागीय आयुक्त (सर्व)
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी,नॅशनल हेल्थ एजन्सी,भारत सरकार, नवी दिल्ली
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी,वरळी, मुंबई
१५) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
१६) उप महासंचालक, आधार (यु.आय.डी), टेलिफॅोन एक्चेंज बिल्डींग, कफ परेड, मुंबई
१७) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
१८) जिल्हाधिकारी /आयुक्त, महानगरपालीका(सर्व)
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व)
२०) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२१) संचालक, वैद्यकिय शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
२२) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२३) जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
२४) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२५) नियंत्रक, शिधावाटप, मुंबई
२६) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२७) सहसंचालक/ उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
२८) जिल्हा पुरवठा अधिकारी, (सर्व)
२९) जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)

३०) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)
३१) सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३२) उप सचिव,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
३३) उप सचिव, उद्योग उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
३४) उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई
३५) उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
३६) सर्व कार्यासने , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३७) नियोजन विभाग (कार्यासन१४७२), मंत्रालय, मुंबई
३८) वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.
३९) भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश वसंतराव भगवान चौक, नरीमन पाईंट , मुंबई-२०
४०) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर मुंबई- २८
४१) इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय)समिती टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
४२) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पाईंट मुंबई- २१
४३) बहुजन समाज पक्ष, डी-१ इन्सा हठमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१
४४) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई -०४
४५) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई -१३
४६) निवड नस्ती (आरोग्य-६)

## प्रपत्र -अ

| Sr No | Category | Category Code | Sub Category | Sub Category Code | Procedures | Procedure code | Mandatory documents at the time of Preauth | Mandatory documents at the time of Claim | Relaxations given |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Critical Care | M3 | Critical Care | M3Q1 | Acute Bronchitis And Pneumonia With Respiratory Failure, Ventilator 10 Days Stay | M3Q1.3 | Chest X-Ray/ **HRCT Chest, Machine generated ABG,** Clinical photo with ventilatory support, | Abg, Lab Investigations, Post Treatment Evidence Of Clinical Improvement | HRCT Chest exempted |
| 2 | Critical Care | M3 | Critical Care | M3Q1 | Septic Shock (ICU Management) With Ventilatory Assistance | M3Q1.8 | **Machine generated ABG,** RFT, **USG,** Urine R/M, Clinical photograph, Xray chest, CBC. **Justification from treating Physician for necessity of ventilatory support if SpO2 is <80%, esp. of no evidence of alkalosis/acidosis,** Screen shot of spo2 | Abg, Lab Investigations, Post Treatment Evidence Of Clinical Improvement, Report Of Blood Culture/ Urine Culture . **If Blood Culture Report is Negative then other Markers of Sepsis Like Urine Culture/ Sputum Culture/Csf Analysis/ C3 Marker To Be Given To Confirm The Dignosis Of Septic Shock.** | Other Markers Of Sepsis Like Urine Culture/ Sputum Culture/Csf Analysis/ C3 Marker To Be Given To Confirm The Dignosis Of Septic Shock exempted |
| 3 | Critical Care | M3 | Critical Care | M3Q1 | ARDS Plus DIC (Blood & Blood Products) With Ventilatory Care | M3Q1.6 | Chest X-Ray, Machine generated ABG, Clinical photo with ventilator support, CBC, **DIC profile** BTCT | ABG, Lab Investigations, Post Treatment Evidence Of Clinical Improvement | No |

| Sr No | Category | Category Code | Sub Category | Sub Category Code | Procedures | Procedure code | Mandatory documents at the time of Preauth | Mandatory documents at the time of Claim | Relaxations given |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | Critical Care | M3 | Critical Care | M3Q1 | ARDS With Ventilatory Care 14 Days Stay | M3Q1.4 | Chest X-Ray/ **HRCT Chest, Machine generated ABG,** Clinical photo with Ventilatory support, For ARDS packages Ventilator with NIV Mask / invasive ventilator should be discretion of treating physician. **CPAP, BiPAP is not accepted** | Abg, Lab Investigations, Post Treatment Evidence Of Clinical Improvement | HRCT Chest exempted. Only invasive ventilator permitted. NIV mask not allowed. |
| 5 | Critical Care | M3 | Critical Care | M3Q1 | ARDS With Multi Organ Failure With Ventilatory Care 14 Days Stay | M3Q1.5 | Chest X-Ray/ **HRCT Chest, Machine generated ABG,** Clinical photo, RFT, LFT, CBC, **Sr Electrolites** For ARDS packages **Ventilator with NIV Mask /** invasive ventilator should be discretion of treating physician | ABG, Lab Investigations(Cbc, Lft, Rft), Post Treatment Evidence Of Clinical Improvement. Justification From Treating Dr For Standalone Niv Treatment(If Given) In Ards | HRCT Chest exempted. Only invasive ventilator permitted. NIV mask not allowed. |
| 6 | Nephrology | M8 | Nephrology | M8T2 | Rapidly Progressive Renal Failure (RPRF)10 Days | M8T2.4 | RFT, S. Protein, USG Abdomen, Sr. Electrolytes, (ANA/DsDNA/ANCA/C3 /C4 optional) | Post Treatment Evidence Of Clinical Improvements & Lab Investigations, Renal Biopsy | No |
| 7 | Pulmonology | M10 | Pulmonology | M10T4 | Acute Respiratory Failure (Without Ventilator) 10 Days Stay | M10T4.5 | **Serum Electrolytes,** ABG, ECG, Sputum / Bronchial Washing / ET Suctions for Analysis x ray mandatory for pre auth. | Post Treatment Evidence Of Clinical And Lab Investigations | No |
| 8 | Pulmonology | M10 | Pulmonology | M10T4 | Acute Respiratory Failure (With Ventilator) 10 Days Stay | M10T4.6 | **Serum Electrolytes,** ABG, ECG, Sputum / Bronchial Washing / ET Suctions for Analysis x ray mandatory for pre auth. | Post Treatment Evidence Of Clinical And Lab Investigations | No |

# प्रपत्र -ब

120 Govt. Reserved Procedures out of 996 procedures covered under MJPJAY

| Sr no. | Category | Procedure name |
|---|---|---|
| 1 | ENT Surgery | Brachial Cyst Excision |
| 2 | ENT Surgery | Removal of Submandibular Salivary Gland |
| 3 | ENT Surgery | Parotid Duct Repair |
| 4 | ENT Surgery | Branchial Sinus Excision |
| 5 | ENT Surgery | Partial Glossectomy |
| 6 | ENT Surgery | Abbe Operation |
| 7 | ENT Surgery | Wedge Excision |
| 8 | ENT Surgery | Cystic Hygroma Excision-Major |
| 9 | ENT Surgery | Hemi/Partial/Subtotal Thyroidectomy |
| 10 | ENT Surgery | Isthmectomy |
| 11 | ENT Surgery | Total Thyroidectomy |
| 12 | ENT Surgery | Cystic Hygroma Excision-Minor |
| 13 | ENT Surgery | Para thyroidectomy |
| 14 | ENT Surgery | Excision Of Thyroglossal Cyst Fistula |
| 15 | GENERAL SURGERY | Epigastric Hernia Without Mesh |
| 16 | GENERAL SURGERY | Epigastric Hernia With Mesh |
| 17 | GENERAL SURGERY | Hiatus Hernia Repair Abdominal |
| 18 | GENERAL SURGERY | Rare Hernias (Spigalion,Obuturator,Sciatic) |
| 19 | GENERAL SURGERY | Umbilical Hernia Without Mesh |
| 20 | GENERAL SURGERY | Umbilical Hernia With Mesh |
| 21 | GENERAL SURGERY | Ventral And Scar Hernia Without Mesh |
| 22 | GENERAL SURGERY | Ventral And Scar Hernia With Mesh |
| 23 | GENERAL SURGERY | Lap. Appendicectomy |
| 24 | GENERAL SURGERY | Pyloromyotomy |
| 25 | GENERAL SURGERY | Operation For Hydatid Cyst Of Liver |
| 26 | GENERAL SURGERY | Cholecystectomy |
| 27 | GENERAL SURGERY | Lap.Cholecystectomy |
| 28 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Cholecystectomy & Exploration Cbd |
| 29 | GENERAL SURGERY | Repair Of Cbd |
| 30 | GENERAL SURGERY | Splenectomy For Hypersplenism |
| 31 | ENT Surgery | Facial Nerve Decompression |
| 32 | ENT Surgery | Excision Of Tumors In Pharynx |
| 33 | ENT Surgery | Adenoidectomy - Gromet Insertion |
| 34 | ENT Surgery | Endoscopic Sinus Surgery |
| 35 | ENT Surgery | Mastoidectomy |
| 36 | ENT Surgery | Tympanoplasty |
| 37 | ENT Surgery | Stapedectomy - Veingraft |

| | | |
|---|---|---|
| 38 | ENT Surgery | Excision Of Benign Tumour Nose |
| 39 | ENT Surgery | Angiofibroma Nose |
| 40 | ENT Surgery | Endoscopic DCR |
| Sr no. | Category | Procedure name |
| 41 | OPHTHALMOLOGY SURGERY | Enucleation with Orbital implant |
| 42 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Lavh |
| 43 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Vaginal Hysterectomy With Pelvic Floor Repair |
| 44 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Vaginal hysterectomy with mesh |
| 45 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Laparoscopic Cystectomy |
| 46 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Vaginal Hysterectomy |
| 47 | ORTHOPEDIC SURGERY AND PROCEDURES | Amputations - Forequarter |
| 48 | ORTHOPEDIC SURGERY AND PROCEDURES | Amputations - Hind Quarter And Hemipelvectomy |
| 49 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Partial Gastrectomy |
| 50 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Total Gastrectomy |
| 51 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Distal Gastrectomy For Gastric Outlet Obstruction |
| 52 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Cyst Excision + Hepatic Jejunostomy |
| 53 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Choledochoduodenostomy Or Choledocho Jejunostomy |
| 54 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Splenectomy |
| 55 | SURGICAL GASTRO ENTEROLOGY | Spleenectomy For Space Occupying Lesion |
| 56 | PLASTIC SURGERY | Cleft Lip |
| 57 | PLASTIC SURGERY | Cleft Palate |
| 58 | PEDIATRIC SURGERIES | Congenital Dermal Sinus |
| 59 | PEDIATRIC SURGERIES | Cystic Lesions Of The Neck |
| 60 | PEDIATRIC SURGERIES | Sinuses & Fistula Of The Neck |
| 61 | PEDIATRIC SURGERIES | Thoracic Wall Defects- Correction |
| 62 | PEDIATRIC SURGERIES | Gastro Esophageal Reflux Correction |
| 63 | PEDIATRIC SURGERIES | Laparoscopic Choleycystectomy |
| 64 | PEDIATRIC SURGERIES | Scrotal Transposition Repair |
| 65 | PEDIATRIC SURGERIES | Undescended Testis |
| 66 | GENITO URINARY SURGERIES | Orchidopexy Bilateral |

| Sr no. | Category | Procedure name |
|---|---|---|
| 67 | GENITO URINARY SURGERIES | Open Pyelolithotomy |
| 68 | GENITO URINARY SURGERIES | Open Cystolithotomy |
| 69 | GENITO URINARY SURGERIES | Renal Cyst Excision |
| 70 | GENITO URINARY SURGERIES | Vasico Vaginal Fistula |
| 71 | GENITO URINARY SURGERIES | Epispadiasis - Correction |
| 72 | GENITO URINARY SURGERIES | Ureterocele |
| 73 | GENITO URINARY SURGERIES | Open Prostatectomy |
| 74 | GENITO URINARY SURGERIES | Total Cystectomy |
| 75 | NEUROSURGERY | Ventricular Tapping |
| 76 | NEUROSURGERY | Abscess Tapping |
| 77 | NEUROSURGERY | C.S.F. Rhinorrhoea |
| 78 | NEUROSURGERY | Laminectomy |
| 79 | NEUROSURGERY | Discectomy |
| 80 | NEUROSURGERY | Anterior Discectomy & Bone Grafting |
| 81 | NEUROSURGERY | Discectomy With Implants |
| 82 | NEUROSURGERY | Spinal Fixation Rods And Plates, Artificial Discs |
| 83 | PLASTIC SURGERY | Tm Joint Ankylosis |
| 84 | PLASTIC SURGERY | Leprosy Reconstructive Surgery |
| 85 | PLASTIC SURGERY | Vaginal Atresia |
| 86 | PLASTIC SURGERY | Cup And Bat Ears |
| 87 | DERMATOLOGY | Pemphigus /Pemphigoid |
| 88 | DERMATOLOGY | Toxic Epidermal Necrolysis |
| 89 | RHEUMATOLOGY | Sle (Systemic Lupus Erythematosis) |
| 90 | RHEUMATOLOGY | Sle With Sepsis |
| 91 | RHEUMATOLOGY | Scleroderma |
| 92 | RHEUMATOLOGY | Mctd Mixed Connective Tissue Disorder |
| 93 | RHEUMATOLOGY | Vasculitis |
| 94 | GASTROENTEROLOGY | Achalasia Cardia |
| 95 | GASTROENTEROLOGY | Gastric Varices |
| 96 | OPHTHALMOLOGY SURGERY | Pterygium + Conjunctival Autograft |
| 97 | ENT Surgery | Myringotomy without grommet insertion |
| 98 | ENT Surgery | Phono Surgery For Vocal Cord Paralysis |
| 99 | ORTHOPEDIC SURGERY AND PROCEDURES | Disarticulation (hind & for quarter) |

| Sr no. | Category | Procedure name |
|---|---|---|
| 100 | ORTHOPEDIC SURGERY AND PROCEDURES | Limb Lengthening |
| 101 | GENITO URINARY SURGERIES | Varicocele-unilateral |
| 102 | GENITO URINARY SURGERIES | Varicocele-bilateral |
| 103 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Tuboplasty |
| 104 | General Surgery | Excision Pilonidal Sinus |
| 105 | General Surgery | Eversion of Hydrocele Sac- unilateral |
| 106 | General Surgery | Haemorroidectomy+ Fistulectomy with or without sphinctor repair |
| 107 | General Surgery | Fissurectomy |
| 108 | General Surgery | Fissurectomy with Sphincterotomy |
| 109 | General Surgery | Inguinal Hernia Repair |
| 110 | General Surgery | Prolapse of Rectal Mass – Excision |
| 111 | General Surgery | Haemorroidectomy |
| 112 | General Surgery | Scrotal Swelling (Multiple) – Excision |
| 113 | PEDIATRIC SURGERIES | Inguinal Hernia & Hydrocele |
| 114 | Mental Disorders Packages | F20-F29<br>Schizophrenia, schizotypal and delusional disorders |
| 115 | Mental Disorders Packages | F30-F39<br>Mood (affective) disorders |
| 116 | Mental Disorders Packages | Pre- Electro Convulsive Therapy (ECT) and Pre- rTranscranial Magnetic Stimulation (TMS)Package * |
| 117 | Mental Disorders Packages | Electro Convulsive Therapy (ECT) |
| 118 | GYNAECOLOGY AND OBSTETRICS SURGERY | Hysteroscopic adhesiolysis |
| 119 | General Surgery | Ligation of Ankle Perforators |
| 120 | General Surgery | Benign Soft Tissue Tumor (small) – Excision |

# प्रपत्र- क

| Sr No | | CGHS TREATMENT PROCEDURE/INVESTIGATION LIST (DELHI/NCR) | Rate in Rs. |
|---|---|---|---|
| **Minor and OPD Procedures** | | | |
| 1 | | Aspiration Plural Effusion - Diagnostic | 138 |
| 2 | | Phimosis Under LA | 1508 |
| 3 | | Injection for Haemorrhoids | 476 |
| 4 | | Injection for Varicose Veins | 403 |
| 5 | | Excision of Warts | 357 |
| 6 | | Conjunctival wound repair or exploration following blunt trauma | 3795 |
| 7 | | Removal of corneal foreign body | 132 |
| 8 | | Bandage contact lenses for corneal perforation | 529 |
| 9 | | Re-suturing (Primary suturing) of corneal wound | 1323 |
| 10 | | Probing and Syringing of lacrimal sac- in one eye | 79 |
| 11 | | Probing and Syringing of lacrimal sac- in both eye | 159 |
| 12 | | Refraction | 46 |
| 13 | | Indirect Ophthalmoscopy | 77 |
| 14 | | Non Contact tonometry | 58 |
| 15 | | Pure Tone Audiogram | 198 |
| 16 | | Removal of foreign body From Nose | 397 |
| 17 | | Removal of foreign body From Ear | 265 |
| 18 | | Syringing (Ear) | 191 |
| 19 | | Biopsy | 529 |
| 20 | | Excision of lumps | 2000 |
| 21 | | Suturing of small wounds | 309 |
| 22 | | Removal Of Foreign Bodies | 345 |
| 23 | | Gastroscopy | 1984 |
| 24 | | Primary Suturing of Wound | 345 |
| 25 | | Fingers (post slab) | 298 |
| 26 | | Fingers full plaster | 298 |
| 27 | | Figure of 8 bandage | 596 |
| 28 | | Collar and cuff sling | 300 |
| 29 | | Application of P.O.P Casts for Upper & Lower Limbs | 728 |
| 30 | | Ultrasonic therapy | 90 |
| 31 | | S.W. Diathermy | 90 |
| 32 | | Electrical stimulation (therapeutic) | 90 |
| 33 | | Muscle testing and diagnostic | 82 |
| 34 | | Infra red | 90 |
| 35 | | U.V. Therapeutic dose | 67 |
| 36 | | Wax bath | 86 |
| 37 | | Hot pack | 90 |
| **Major Procedures** | | | |
| 38 | | Oesophagoscopy/foreign body removal from | 2070 |
| 39 | | Exchange Transfusion | 305 |
| 40 | | Normal delivery with or without Episiotomy & P. repair | 9200 |
| 41 | | vacuum delivery | 9919 |
| 42 | | Cesarean Section | 16158 |
| 43 | | Manual Removal of Placenta | 3968 |

| | | | |
|---|---|---|---|
| 44 | | Complete perineal tear-repair | 2447 |
| 45 | | Exploration of PPH-tear repair | 4025 |
| 46 | | Repair of post-coital tear/ perineal injury | 4034 |
| 47 | | Diagnostic Curettage | 2857 |
| 48 | | Colposcopy | 1102 |
| 49 | | Dilatation of Stricture Urethra under G.A. | 2300 |
| 50 | | Dilatation of Stricture Urethra under LA | 1984 |
| 51 | | Close Reduction of Fractures of Limb & P.O.P without internal fixation | 2990 |
| 52 | | Removal of Wires & Screw | 2024 |
| 53 | | Removal of Plates | 4761 |
| 54 | | Upper G.I. Endoscopy + Lower G.I. Endoscopy | 1984 |
| 55 | | Endoscopic biopsy | 397 |
| 56 | | Foreign body removal | 1984 |
| **Imaging and Other Investigations** | | | |
| 57 | | ECG | 58 |
| 58 | | 2 D echocardiography | 1380 |
| 59 | | Fetal Echo | 1610 |
| 60 | | 2 D TEE | 1650 |
| 61 | | Stress Echo- exercise | 1725 |
| 62 | | Occlusal X-ray | 90 |
| 63 | | Abdomen AP Supine or Erect (One film) | 150 |
| 64 | | Abdomen Lateral view (one film) | 150 |
| 65 | | Chest PA view (one film) | 70 |
| 66 | | Chest Lateral (one film) | 70 |
| 67 | | ANC Sonography - Anomaly scan | 150 |